# भुयारी मेट्रो धारावी स्टेशनवर

## मेट्रो-३ मार्गिकेचा २३ वा टप्पा; नया नगर ते धारावीपर्यंतचे काम पूर्ण

**मुंबई : प्रतिनिधी**

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या भुयारी मेट्रो-३ च्या भुयारीकरणाचा २३ वा टप्पा गुरुवारी पूर्ण करण्यात आला आहे. टीबीएम कृष्णा-१ ने नया नगर ते धारावीमधील ५८९.४ मी. इतके अंतर ४२१ रिंगच्या सहाय्याने पूर्ण केले. अद्याप पॅकेज ४ मध्ये १०.९ किमीपैकी ८.२ कि. मी. भुयारीकरण पूर्ण झाले असल्याची माहिती मुंबई मेट्रो रेल कॉर्पोरेशन लिमिटेडने (एमएमआरसीएल) दिली.

कुलाबा-वांद्रे-सीप्झ या संपूर्णतः भुयारी मार्गिकेच्या कामामध्ये एकूण ३२ भुयारी टप्पे पार पडणार असून त्यातील आत्तापर्यंत २३ टप्पे पार करण्यात आले आहेत. गोदावरी-२ या टनेल बोरिंग मशीनच्या मदतीने पॅकेज सहामधील विद्यानगरी ते छत्रपती शिवाजी महाराज आंतरराष्ट्रीय विमानतळ टी १ या स्थानकादरम्यान डाऊन लाईनच्या दिशेने २.८ किलोमीटरचे अंतर २ हजार ४८ रिंगच्या मदतीने गेल्या दोन आठवड्यांपूर्वीच पूर्ण करण्यात आले होते. २२ ऑक्टोबर रोजी एमएमआरसीएलने २१वा भुयारी टप्पा पार केला होता.

सूर्या-२ या टनेल बोरिंग मशीनची यासाठी मदत घेण्यात आली. विधान भवन ते चर्चगेट या स्थानकांदरम्यान डाऊन लाईनच्या दिशेने ४८२ मीटर इतके अंतर ९० दिवसांमध्ये पूर्ण करण्यात आले होते. धारावी येथे भुयारीकरणाचा २० वा टप्पा पार पडला. टनेल बोरिंग मशीन कृष्णा-२ ची यासाठी मदत घेण्यात आली.



**मुंबई : टनेल बोरिंग मशीन धारावीच्या नया नगरमधील नियोजित स्थानकाच्या जागेत पोहोचले. त्यावेळची स्थिती टिपणारी ही छायाचित्रे.**

पॅकेज ४ मधील ४ था टप्पा पूर्ण करताना नया नगर ते धारावी स्थानकांदरम्यानचे ५९० मीटर भुयारीकरण १३० दिवसांत पूर्ण करण्यात आले होते. ३ ऑक्टोबर रोजी भुयारीकरणाचा १९ वा टप्पा पार करण्यात आला. यासाठी सूर्या-१ ची मदत घेण्यात आली. विधान भवन ते चर्चगेट स्थानकांदरम्यानचे ४९९ मीटर भुयारीकरण तब्बल ९० दिवसांत पूर्ण करण्यात आले.